# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९
ईमेल-: srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

429

जा.क्र.झोपुप्रा/प्रशा/१६४०/२०२३
दिनांक:-०७/०९/२०२३

परिपत्रक क्र. ०७/२०२३

विषय:- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या सदनिकांचे अनधिकृत हस्तांतरणाबाबत व पुनर्वसन सदनिकेतून अनधिकृत व्यक्तीचे निष्कासन करून अशा सदनिका प्राधिकरणाच्या ताब्यात घेणेबाबत कार्यवाही करण्यासाठी दक्षता पथक निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ई) व प्राधिकरणासाठी प्रचलित असलेल्या सन २०१४ च्या नियमावलीतील नियम क्रमांक एस.आर ७ (३) मधील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये लाभ मिळालेल्या पुनर्वसन सदनिका वाटप दिनांकापासून १० वर्षापर्यंत विक्री, बक्षीसपत्र, बदल, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत / भाडेतत्वावर / विक्री करता येत नाहीत व त्यानंतर प्राधिकरणाच्या परवानगीने हस्तांतरण अनुज्ञेय आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या सदनिकांचे अनधिकृत हस्तांतरण होत असल्याचे निदर्शनास आल्याने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरित झालेल्या सदनिकांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी अशा अनधिकृत हस्तांतरणाबाबत निर्णय घेऊन अनधिकृत व्यक्तीचे निष्कासन करण्याच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत खालीलप्रमाणे दक्षता पथक निर्माण करण्यात येत आहे :

१. दक्षता पथक प्रमुख - संबंधित योजनेशी संबंधित सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी.
२. सदस्य - तहसीलदार (ताबा विभाग).
३. सदस्य - सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था.
४. सदस्य - योजनेशी संबंधित सक्षम प्राधिकारी विभागांतर्गत कार्यरत तहसीलदार.

वरील दक्षता पथकाने पहिल्या टप्प्यात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या अहवालानुसार व त्यानंतर स्वाधिकारे सह. गृहनिर्माण संस्थेमधील अनधिकृतपणे हस्तांतरण झालेल्या सदनिकांसंदर्भात पाहणी करावी व त्यानुसार विहीत प्रक्रीया पार पाडून महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ई) (२) मधील तरतूदीनुसार योजनेशी संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी निष्कासन आदेश पारित करावेत. योजनेशी संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी प्रत्यक्ष निष्कासनाची कार्यवाही करून रिकामी झालेली सदनिका झो.पु.प्रा.कडील तहसीलदार (ताबा) यांचे ताब्यात देऊन तसा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा. निष्कासन आदेशाविरूद्ध संबंधित सदनिकाधारकास सचिव, झो.पु.प्रा.,पुणे यांचेकडे विहीत मुदतीत अपील दाखल करता येईल.

वितरीत केलेल्या सदनिकेमध्ये अनधिकृतपणे राहणाऱ्या व्यक्तीस सदनिकेमधून निष्कासित करताना सक्षम प्राधिकारी यांनी उक्त अधिनियमाचे कलम ३ (ई) (२) मधील तरतुदींचे व प्रचलित शासन / प्राधिकरण आदेशांचे पालन करणे आवश्यक राहील.

उपरोक्त आदेश तात्काळ अंमलात येतील.

(नीलेश र. गटणे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
१.९.२३

प्रत/- तात्काळ अंमलबजावणी साठी
सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी.